## खाद्य व्यवस्थापन :

पिल्ले वाहतूक करून आणल्याबरोबर ५% ग्लुकोज अथवा २५ ग्रॅम गुळ प्रति १०० पिल्ले स्वच्छ पाण्यात मिसळून पाणी पिण्यास द्यावे. वनराज पिल्लांना २४०० कि. कॅलरी ऊर्जा, १६० ग्रॅम प्रथिने, ७.७ ग्रॅम लायसिन, ३.६ ग्रॅम मिथिओनाइन, ३.५ ग्रॅम फॉस्फरस व ७ ग्रॅम कॅलशियम प्रति किलो खाद्यात आवश्यक आहे. हे खाद्य उपलब्ध खाद्य घटकांपासून बनवता येते. ऊर्जेसाठी मका, ज्वारी, बाजरी, तांदूळ कणी इ. तसेच प्रथिनासाठी सुर्यफूल, शेंगदाणा, सोयाबिन इ. पेंडी वापरता येतात.



## कोंबडी पालनाच्या तीन पद्धतीनुसार खाद्य :

**१) मुक्त कोंबडी पालन** - यामध्ये सुरुवातीपासून पिल्ले चरावयास मोकळी सोडली जातात. हे पक्षी धान्याचे मात्र, किडे, मुंगी, गवत यावर मोठे करता येतात.



**२) अर्ध बंधिस्त** - यामध्ये ३ ते ४ आठवडे पक्षांना वरीलप्रमाणे खाद्य बनवून अथवा तयार प्रिस्टार्टर खाद्य ४०० ग्रॅम प्रति पक्षी तसेच स्टार्टर खाद्य ६०० ग्रॅम प्रति पक्षी प्रमाणे द्यावे. यानंतर पक्षी बाहेर चरावयास सोडावेत. पक्षांना सवय लागेपर्यंत त्यांची काळजी घ्यावी.



**३) बंधिस्त पालन** - या मध्ये वरीलप्रमाणे प्रिस्टार्टर, स्टार्टर खाद्य द्यावे, त्यानंतर फिनिशर खाद्य वयाच्या ७ ते ८ आठवड्यांपर्यंत द्यावे. त्यानंतर पक्षी मांसाठी विक्री करता येतात. बंधिस्त कोंबडी पालन करताना पक्षांच्या खाद्यावर तसेच इतर व्यवस्थापनावर जातीने लक्ष देणे आवश्यक असते.



## औषधे व लसीकरण व्यवस्थापन :

पिल्लांना पहिले ४ दिवस पाण्यातून प्रतिजैवक उदा. लिक्सीन १ ग्रॅम प्रति ५ लिटर, एन्रोफ्लॉक्सेसीन १०% अर्धा मिली प्रति लिटर अथवा निओमायसीन + डॉक्सीसाक्लीन १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून द्यावे तसेच 'ब' जीवनसत्त्वे १० मिली प्रति १०० पिल्ले प्रतिदिन प्रमाणे द्यावे. पक्षांना लसीकरणामुळे येणारा ताण कमी करण्यासाठी लसीकरणपूर्वी १ दिवस व नंतर दोन दिवस 'ब' जीवनसत्त्वे द्यावीत. पक्षांना नेहमी निर्जंतुक पाणी पिण्यास द्यावे. यासाठी क्लोरीनचा वापर करावा.



## लसीकरण वेळापत्रक

| वय (दिवस) | लस | प्रमाण | देण्याची जागा |
|---|---|---|---|
| १ | मरेक्स् लस | ०.२० मिली | त्वचे खाली |
| ५-७ | रानीखेत (लासोटा) | १ थेंब | डोळ्यातून / नाकातून |
| १८ | रानीखेत (लासोटा) | १ थेंब | डोळ्यातून / नाकातून |
| २८ | रानीखेत (आर२ बी) | ०.५० मिली | त्वचे खाली |
| ४२ | कोंबड्यांचा देवी लस | ०.२ मिली | मांसात |

कृषि विज्ञान केंद्र सोलापूरने कोंबडीच्या गिरीराजा व वनराजा पक्षांचा परसातील कोंबडी पालन अंतर्गत मोठ्या प्रमाणावर प्रसार व प्रचार सोलापूर जिल्ह्यामध्ये केलेला असून महिला व ग्रामीण यवुकांमध्ये कोंबडी पालनाबाबत जागृती निर्माण करून स्वयंरोजगाराचे प्रभावी साधन उपलब्ध करून दिले आहे.


संपादक व प्रकाशक
**डॉ. ला. रा. तांबडे**
कार्यक्रम समन्वयक

लेखक
**डॉ. प्र. वि. कदम**
विषय विशेषज्ञ (पशु वैद्यक शास्त्र)
**डॉ. ला. रा. तांबडे**
कार्यक्रम समन्वयक



तांत्रिक साहाय्य
प्रकल्प संचालक
राष्ट्रीय कोंबडी पालन संचलनालय, राजेंद्र नगर, हैद्राबाद.

प्रकाशन वर्ष : २००८ घडी पुस्तिका क्र. : १७


(S.K.P.) (I.C.A.R.)

# आधुनिक कोंबडी पालन



## कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर


सोलापूर–बार्शी रोड, मु. खेड, पो. केगाव,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र)
फोन : ०२१७ – २३५०३५९


# आधुनिक कोंबडी पालन

भारतामध्ये वार्षिक सरासरी ५.७% व १२.५% दराने अंडी व चिकन उत्पादनामध्ये वाढ होत आहे. परंतू यामध्ये थोडे लोक व काही भागामध्येच कोंबडी पालनाची वाढ होताना दिसत आहे. या उत्पादनापैकी ७५% अंडी व जवळ जवळ १००% मांस शहरी भागामध्ये वापरले जाते. ग्रामीण भागामध्ये मांस व अंड्याची उपलब्धता नगण्य आहे. हे उत्पादन ग्रामीण भागात पोचेपर्यंत याची किंमत (१० ते ४०%) वाढते. ग्रामीण भागामध्ये पारंपारिक पद्धतीच्या आहारामध्ये उर्जायुक्त घटकांचा समावेश जास्त असून प्रथिनयुक्त आहाराचे प्रमाण कमी असते. त्यामुळे कोंबडीपासून मिळणारे मांस व अंडी याचा आधुनिक पद्धतीने परसातील कोंबडीपालन करून अथवा व्यावसायिक कोंबडी पालन करून ग्रामीण माणसाच्या आहाराची पोषकता वाढवता येईल. त्याचबरोबर गावातल्या गावात कोंबडी पालनाच्या माध्यमातून रोजगाराचे साधण उपलब्ध होईल.

परसातील कोंबडीपालनासाठी वेगवेगळ्या जाती विकसीत केल्या आहेत. यामध्ये अंडी व मांस उत्पादनासाठी गीरीराजा व वनराजा या जाती तर अंडी उत्पादनासाठी ग्रामप्रिया, गिरीराणी, कृष्णा-जे, नंदनम्-९९, ग्राम लक्ष्मी, कलिंगा ब्राऊन तसेच मांस उत्पादनासाठी कृषि ब्रो या जाती विकसीत केल्या आहेत.

या जातीपासून उच्च दर्जाचे मांस व अंडी उत्पादन मिळते. गावठी कोंबडी प्रमाणेच कोणत्याही वातावरणात या जाती रूळतात. स्वच्छ खेळती हवा, नैसर्गिक प्रकाश असलेल्या व ऊन, वारा, पाऊस इत्यादी गोष्टीपासून संरक्षण होईल अशा जागेमध्ये या कोंबड्या सहज पाळता येतात.

## गिरीराज व वनराज पक्षांची वैशिष्टये :



- आकर्षक वेगवेगळ्या रंगांची पिसे.
- मरतूकीचे प्रमाण अतिशय कमी.
- नगण्य अथवा अतिशय कमी उत्पादन खर्च.
- खाद्याचे मांसात रूपांतर करण्याचे प्रमाण उत्कृष्ट.
- अंड्याचा आकार मोठा व जास्त अंडी उत्पादन.
- चांगली रोगप्रतिकारक क्षमता.

## गिरिराज, वनराज व गावठी कोंबडी यांची गुणवत्ता दर्शविणारा तक्ता

| वैशिष्टये | गिरिराजा | वनराजा | देशी कोंबडी |
|---|---|---|---|
| सहाव्या आठवड्यातील वजन | ---- | ७०० ते ८५० ग्रॅम | २५०-४०० ग्रॅम |
| आठव्या आठवड्यातील वजन | १३७२ ग्रॅम | ---- | ४०० ते ६०० ग्रॅम |
| एक किलो वजन वाढीसाठी लागणारे खाद्य | २.५ किलो | ---- | ३.२ किलो |
| जगण्याचे प्रमाण | ९८% | ९८% | ८८% |
| निव्वळ मांस उत्पादन | ७४% | ७२% | ६५.६८% |
| वयात येण्याचा कालावधी | १६६ दिवस | १७९ दिवस | १९८ दिवस |
| अंडी उत्पादन | | | |
| २८० दिवसामध्ये | ७३ | ५५-६५ | २०-४० |
| ५०० दिवसामध्ये | १८० | १४०-१५० | ७० |
| एका अंड्याचे वजन | ५५ ग्रॅम | ५२-५८ ग्रॅम | ४३ ग्रॅम |

## व्यवस्थापन :

### कोंबड्यांची घरे, स्वच्छता व निर्जंतुकीकरण :

पक्षांची विक्री होताच ५ ते १०% फॉर्मालीन फवारावे. गादी (लिटर) काढून लांब खड्ड्यात टाकावे. भांडी, पडदे व इतर साहित्य बाहेर काढून जमिनीवरील सर्व घाण खरडून साफ करावी. संपूर्ण घर पाण्याने स्वच्छ धुवून काढावे. भेगा, जाळ्या, खांब सर्व फ्लेमगनने जाळून काढावे. जमिनीवर १ किलो कॉस्टीक सोडा प्रति ५०० ते १००० चौ. फूट प्रमाणे पसरून पाणी शिंपडावे व २४ तास ठेवून धुवून काढावा. ५% फॉर्मालीनच्या द्रावणाने शेड धुवून घ्यावे. पुन्हा शेड स्वच्छ पाण्याने धुवावे. शेडमधील भांडी व इतर साहित्य धुवून निर्जंतुक करून पुन्हा वापरास घ्यावे.

घराच्या सभोवतालच्या परिसरातील गवत, झुडपे काढून टाकावीत. उंदीर, घुशींचा नायनाट करावा. स्वच्छ केलेल्या जमिनीवर ५ ते १०% फॉर्मालीन फवारावे. चार किलो चुना १० लिटर पाण्यात मिसळून घर आतून-बाहेरून रंगवून घ्यावे.

घराचे धुरीकरण करण्यासाठी संपूर्ण घर पॅकबंद करून १००० घनफुटासाठी २०० ग्रॅम पोटॅशिअम परमॅंगनेटमध्ये ४०० मिली फॉर्मालीन मिसळावे व नंतर २४ तास घर बंद ठेवावे. त्यानंतर १२ तासांनी पिल्ले सोडण्यास हरकत नाही. घराच्या निर्जंतुकीकरण कार्यक्रमासाठी साधारणत: १२ ते १५ दिवसांचा कालावधी लागतो.

### गादी (लिटर) व्यवस्थापन :

कोंबडी घरात गादीसाठी शेंगा टरफले, साळीचा, लाकडाचा, गव्हाचा भुस्सा वापरता येतो. भुस्सा प्रथम फॉर्मालिनने धुरीकरण करून निर्जंतूक करून घ्यावा. घरामध्ये २ ते ३ इंच जाडीचा थर द्यावा. हा भुस्सा दररोज हालवून खाली-वर करावा, जेणेकरून कोरडा राहील. ही गादी ओली झाल्यास बदलावी अथवा यामध्ये चुना पावडर मिसळावी.

गिरिराज व वनराज कोंबड्यासाठी सुरवातीचे ३-४ आठवडे कृत्रिम उजेड व उष्णता देणे गरजेचे असते. ४ आठवड्यानंतर परसात मोकळे सोडण्यास हरकत नाही. प्रत्येक पिल्लास २ वॅट प्रमाणे उष्णता बल्बच्या माध्यमातून देणे गरजेचे आहे. ३० पिल्लांसाठी एक कंदील किंवा १०० ते १५० पिल्लांना छोटी कोळशाची शेगडी उष्णतेसाठी वापरता येते. पिल्लांच्या संरक्षणासाठी दाई पद्धतीत चिक गार्ड बसवणे आवश्यक आहे. त्यासाठी पत्रा किंवा प्लास्टीक किंवा बांबूचा तट्टा दिड फूट रूंद गोलाकार पद्धतीने वापरावा. बांबू अथवा पत्र्याचे ब्रुडर (पाटीच्या आकाराचे) बनवून त्यामध्ये होल्डरच्या सहाय्याने बल्ब बसवून ते छताला उलटे टांगावे आवश्यक उष्णतेप्रमाणे त्याची उंची कमी जास्त करता येईल.

४ आठवड्यापर्यंत प्रत्येक पिल्लास १/२ चौ. फूट जागा लागते. जमिनीवर भाताचे तूस, शेंगा टरफले, लाकडाचा भूस्सा यांचा २-३ इंच जाडीचा थर द्यावा. पाण्यासाठी व खाद्यासाठी बाजारात उपलब्ध असलेली भांडी शक्य झाल्यास वापरणे व्यस्थापनाच्या दृष्टीने अधिक कायदेशीर ठरते.



पिल्ले सर्वत्र सारख्या प्रमाणात (योग्य उष्णता)



पिल्ले एकत्र गोळा झालेली (कमी उष्णता)



उष्णतेपासून पिल्ले लांब गेलेली (जास्त उष्णता)

| वय | तापमान (फॅरनाईट) | खाद्यासाठी जागा प्रति पक्षा मागे इंच / पिल्लू | पाण्यासाठी जागा प्रति पक्षामागे इंच / पिल्लू | पाणी लिटर / १०० पिल्ला मागे |
|---|---|---|---|---|
| १ आठवडा | ९५° फॅ. | १.५ | ०.५ | १.८८ |
| २ आठवडा | ९०° फॅ. | २.०० | ०.७ | ३.७६ |
| ३ आठवडा | ८५° फॅ. | २.०० | ०.७ | ५.५६ |
| ४ आठवडा | ८०° फॅ. | २.५ | ०.८ | ७.५७ |
| ५ आठवडा | ७५° फॅ. | २.५ | ०.८ | ७.४६ |
| ६ आठवडा | ७०° फॅ. | ३.० | १.० | ११.३५ |